दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते दिनांक १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित सुमारे ६७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच केवळ न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकाकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम...

निवडणूक प्राथम्य

ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र


क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.०८/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.


दिनांक : ३० जुलै, २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :- दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित सुमारे ६७ मपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच केवळ न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकाकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम...**

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक २६/०७/२०१९ च्या आदेशान्वये देण्यात आलेला मतदार यादी कार्यक्रम

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असल्याने **दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच केवळ न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांकरिता** खालीलप्रमाणे आदेश आयोगाकडून आतापर्यंत निर्गमित झालेले आहेत.

(i) **प्रभाग रचना** - क्रमांक रानिआ/ग्रापंनि २०१९/प्र.क्र.०६/का.०८, दिनांक २८/०५/२०१९ चे प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम आदेश व दिनांक २५/०७/२०१९ चे सुधारीत आदेश. प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमाच्या सुधारीत आदेशान्वये दिनांक २७/०७/२०१९ रोजी सदर कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(ii) **मतदार यादी कार्यक्रम** - क्रमांक रानिआ/ग्रापंनि २०१९/प्र.क्र.८/का.०८, दिनांक २६ जुलै, २०१९ च्या आदेशानुसार दिनांक २९/०७/२०१९ रोजी प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादया प्रसिध्द करण्याची

कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच प्रभाग निहाय अंतिम मतदार यादया दिनांक ०१/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

(iii) **निवडणूक पूर्वतयारी** – आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले निवडणूक पूर्वतयारीचे सविस्तर आदेश

२. आता प्रत्यक्ष निवडणुकीच्या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

२.१ **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविलेल्या ग्राम पंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणुका व **परिशिष्ट क** मध्ये दर्शविल्यानुसार केवळ **न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुका** घेण्यात याव्यात.

२.२. **दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित सुमारे ६७ ग्रामपंचायतींचा** जिल्हानिहाय तपशिल **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविलेला आहे.

२.३ मतदार यादी तसेच निवडणूक कार्यक्रम आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीत पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे.

२.४ निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, **सदर निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.** या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

२.५ **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीव्दारेच** राबविण्यात यावी.

२.६ **परिशिष्ट अ** येथील निवडणुक कार्यक्रमानुसार फक्त गडचिरोली जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व संबंधित जिल्हयात मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

२.७ निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपीलासंदर्भात) यांच्या स्तरावरुन देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबादारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

२.८ ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

२.९ नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सोबत - परिशिष्ट - अ, ब आणि क**

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत** :-१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. अपर मुख्य सचिव ,गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव / सचिव ,मंत्रालय ,मुंबई.०३२ ४००

३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

४.पोलिस महासंचालक, मुंबई, महाराष्ट्र राज्य

५. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

६. प्रधान सचिव ,माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांना उचित कार्यवाहीसाठी

७. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी

८. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांना उचित कार्यवाहीसाठी

९. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४

यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

१०. पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य

११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१३. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)

१४.उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१५. तहसिलदार, संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना निवडणूकीच्या ऑनलाईन प्रक्रियेविषयक कार्यवाहीसाठी.

१६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना निवडणूक कार्यक्रमाच्या प्रसिध्दी विषयक कार्यवाहीसाठी.

१७. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१८. निवड नस्ती.

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.८/का.०८, दिनांक ३० जुलै,२०१९च्या पत्रासोबतचे सहपत्र )

**परिशिष्ट अ**

**दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित सुमारे ६७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच केवळ न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम...**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०१/०८/२०१९ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ०९/०८/२०१९ (शुक्रवार) ते दिनांक १६/०८/२०१९ (शुक्रवार) वेळ स.११.०० ते दु. ३.०० ( दिनांक ११/०८/२०१९ चा रविवार, दि.१२/०८/२०१९ व दि.१५/०८/२०१९ ची सार्व.सुट्टी वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक १९/०८/२०१९ (सोमवार) वेळ स.११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक २१/०८/२०१९ ( बुधवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २१/०८/२०१९ ( बुधवार) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक ३१/०८/२०१९ (शनिवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत (गडचिरोली जिल्हयासाठी स.७.३० वा. पासून ते दु.३.०० वा. पर्यंत ) |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक ०३/०९/२०१९ (मंगळवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०३/०९/२०१९ (मंगळवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांच्या आदेशानुसार

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.८/का.०८, दिनांक ३० जुलै,२०१९ च्या पत्रासोबतचे सहपत्र )

## परिशिष्ट ब

### दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ६ |
| २ | | रायगड | ९ |
| ३ | | रत्नागिरी | ४ |
| ४ | | सिंधुदुर्ग | ३ |
| कोकण विभाग एकूण | | | २२ |
| ५ | नाशिक | नाशिक | २५ |
| ६ | | धुळे | १ |
| नाशिक विभाग एकूण | | | २६ |
| ७ | पुणे | सातारा | ४ |
| ८ | | सोलापूर | १ |
| ९ | | कोल्हापूर | १ |
| पुणे विभाग एकूण | | | ६ |
| १० | औरंगाबाद | उस्मानाबाद | ३ |
| | औरंगाबाद विभाग एकूण | | ३ |
| ११ | अमरावती | अकोला | २ |
| १२ | | यवतमाळ | १ |
| अमरावती विभाग एकूण | | | ३ |
| १३ | नागपूर | वर्धा | ५ |
| १४ | | चंद्रपूर | २ |
| नागपूर विभाग एकूण | | | ७ |
| | एकूण | | ६७ |

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.८/का.०८, दिनांक ३०जुलै,२०१९ च्या पत्रासोबतचे सहपत्र )

## परिशिष्ट क

## न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | न्यायालयीन आदेशांमुळे सरपंच/सदस्य पदांच्या रिक्त जागांसंदर्भात पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | - |
| २ | | पालघर | - |
| ३ | | रायगड | - |
| ४ | | रत्नागिरी | - |
| ५ | | सिंधुदुर्ग | - |
| कोकण विभाग एकूण | | | - |
| ६ | नाशिक | नाशिक | - |
| ७ | | धुळे | - |
| ८ | | जळगांव | - |
| ९ | | अहमदनगर | - |
| १० | | नंदुरबार | - |
| नाशिक विभाग एकूण | | | - |
| ११ | पुणे | पुणे | १ |
| १२ | | सोलापूर | - |
| १३ | | सातारा | - |
| १४ | | सांगली | - |
| १५ | | कोल्हापूर | - |
| पुणे विभाग एकूण | | | १ |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | - |
| १७ | | बीड | १ |
| १८ | | नांदेड | - |
| १९ | | उस्मानाबाद | - |
| २० | | परभणी | - |
| २१ | | जालना | - |
| २२ | | लातूर | - |
| २३ | | हिंगोली | - |
| औरंगाबाद विभाग एकूण | | | १ |
| २४ | अमरावती | अमरावती | - |
| २५ | | अकोला | - |
| २६ | | यवतमाळ | - |
| २७ | | वाशिम | - |
| २८ | | बुलढाणा | - |
| अमरावती विभाग एकूण | | | - |
| २९ | नागपूर | नागपूर | - |
| ३० | | वर्धा | - |
| ३१ | | चंद्रपूर | - |
| ३२ | | भंडारा | - |
| ३३ | | गोंदिया | -- |
| ३४ | | गडचिरोली | - |
| नागपूर विभाग एकूण | | | - |
| एकूण | | | २ |